**गैरअर्जदारातर्फे उलटतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

९. मूळ अर्जदार माझी नणंद आहे. लक्ष्मीबाईने मला वटमुखत्यार देण्यापूर्वी ती या दाव्याकामी न्यायालयात येत होती. दाव्याच्या कामकाजा बाबत लक्ष्मीबाईला माहिती होती. लक्ष्मीबाईचा पती कमरेने अधू आहे. लक्ष्मीबाई व महादूमध्ये मागील ३० ते ३५ वर्षांपासून पोटगीची कामे चालू आहेत. लक्ष्मीबाईचे लग्न माझ्या अगोदर झाले आहे. माझ्या लग्नापूर्वी पासून लक्ष्मीबाई माहेरी राहत होती. मला लक्ष्मीच्या सासरी झालेल्या घटने बाबत माहिती नाही. मला लक्ष्मीबाई व तिच्या पती दरम्यान चाललेल्या कायदेशीर प्रकरणांची माहिती नाही.

१०. लक्ष्मीबाई कोणत्याही मोठया आजाराने त्रस्त नाही. मला दि.०५.०८.२०१० व २८.०४.२०१७ रोजी कोणते वार होते हे आता आठवत नाही. मला त्या दिवशी या दाव्या बाबत न्यायालयात काय झाले होते ते आठवत नाही. मी अशिक्षित असल्यामुळे मला दि. २८.०४.२०१७ पूर्वी मूळ दाव्यात काय झाले ते आठवत नाही. लक्ष्मीबाईला लकवा मारलेला असल्यामुळे ती न्यायालयात हजर राहून पुर्वी काय झाले हे सांगू शकत नाही. मी लक्ष्मीबाईला चालता येत नसल्याबाबतची कागदपत्रे अर्जासोबत दाखल केलेली नाहीत. लक्ष्मीबाईला आजारपणा व्यतिरिक्त न्यायालयात न येण्यासाठी कोणतेही कारण नाही.

११. हे म्हणणे खरे नाही की, सुधाकर जाधव व लक्ष्मीबाईचे जवळचे नातेसंबंध नाही. मला सुधाकरचे लग्न कधी झाले याबाबत सांगता येणार नाही. मी सुधाकरच्या लग्नाचा दाखला हजर करु शकते. लक्ष्मीबाईने कोल्हापूरच्या गुरव वकिल मॅडम यांना काम चालवायला दिले होते. आम्ही त्या वकिल मॅडमना जुन्या न्यायालयात काम चालू असताना कागदपत्रे दिली होती. आम्ही त्यांना नव्या इमारतीत न्यायालय चालू झाल्यानंतर कागदपत्रे दिली नाहीत. न्यायालयाने लक्ष्मीबाईचे काम काढून टाकल्यानंतर आम्ही गुरव मॅडमना परत भेटलो नव्हतो.

१२. मला आम्ही कोणत्या वकिलांना नकला दिल्यानंतर त्यांनी काम दाखल केले नाही याबाबत सांगता येणार नाही. लक्ष्मीबाईला पोटगीचे प्रकरण निकाली निघून पोटगी मंजूर करण्यात आली होती. त्यावरती लक्ष्मीबाईने केलेले अपिल नामंजूर झाले होते. महादेवने लक्ष्मीबाईला थोडी पोटगी दिल्यानंतर पैसे द्यायचे बंद केले होते. महादेवने न्यायालयातले

काम संपल्यामुळे पैसे द्यायचे बंद केले होते. लक्ष्मीबाई व महादेवचे पुर्वीचे भांडण संपल्यानंतर पुढे भांडणे झाली नाहीत.

**१३**. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मीबाई खरी माहिती सांगेल या भीतीमुळे मी तीचे खोटे वटमुखत्यारपत्र घेतले आहे. लक्ष्मीबाई आमच्या घरात राहत असून तिचा खर्च आम्हाला करावा लागू नये अशी आमची अपेक्षा आहे. लक्ष्मीबाईचा तिच्या आई– वडिलांच्या मिळकतीत हिस्सा आहे. आमची शेतीच्या उत्पन्नावर उपजिविका होते. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मीबाई शेतामध्ये काम करुन उपजिविका करते. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतेही कारण नसताना खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ३०.०९.२०२५.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.